मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ १९८ /2025-26 दि. 16/04/2025

प्रति,

1. प्रभाग कार्यालय क्र.01 ते 06
2. सार्वजनिक बांधकाम विभाग
3. नगररचना विभाग
4. पाणी पुरवठा विभाग
5. जन्म-मृत्यु विभाग
6. परवाना विभाग
7. जाहीरात विभाग
8. सार्वजनिक आरोग्य विभाग
9. उद्यान विभाग
10. समाज विकास विभाग
11. मिळकत विभाग
12. अग्निशमन विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय:- दि.28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

संदर्भ :- जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील पत्र क्र.सामान्य/कक्ष-4/सेतू/कावि-03/2025, दि.09/04/2025.

शासनाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/94/2024-Lokshahidin दि. 01 एप्रिल 2025 निर्गमित करुन 28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच मा. मुख्य आयुक्त राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र दि.01/04/2025 च्या अन्वये दि.28 एप्रिल 2025 रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने मनपाच्या कार्यक्षेत्रात सेवा हक्क दिन तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या दशकपूर्तीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करणे व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती करणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

मा.राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसुली विभाग यांनी ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र अ व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र ब मध्ये दिला आहे. त्यानुसार जिल्हा पातळीवर प्रपत्र ब मध्ये आपल्या विभागाशी संबंधीत सेवेनुसार आपल्या स्तरावर कार्यक्रम आयोजित करुन तसा अहवाल इकडील विभागात सादर करण्यात यावा. (सोबत संदर्भिय पत्राची छायांकित प्रत व प्रपत्र अ व ब)

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\आस्थापना विभाग\परिपत्रक\सेवा हक्क दिन.doc

Scanned with OKEN Scanner

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.सामान्य/कक्ष-४/सेतू/कावि- ०३/२०२५ दिनांक ०९/०४/२०२५

प्रति,

१.मा.पोलीस आयुक्त, ठाणे / नवी मुंबई/मिरा-भाइंदर
२.मा.पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण)
३.मा.आयुक्त.ठाणे/कल्याण-डोबिंवली/उल्हासनगर/नवी मुंबई/भिवंडी-निजामपूर/मिरा-भाईदर महानगरपालिका
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे
५. मा.आयुक्त, कामगार विभाग, ठाणे
६. मा.अपर आयुक्त ,आदिवासी विकास विभाग,ठाणे
७. उप वनसरंक्षक, ठाणे
८. उप धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी,ठाणे
९. सहाय्यक राज्यकर सह आयुक्त (प्रशा) ठाणे विभाग वस्तू व सेवाकर कार्यालय,ठाणे
१०. जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे
११. प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,ठाणे -१/ ठाणे -२ /महापे
१२.जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे
१३.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / अंबरनाथ
१४.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,ठाणे १ व २
१५. सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, ठाणे
१६.सह आयुक्त,अन्न औषध प्रशासन, ठाणे
१७.उप नियंत्रक,शिधावाटप फ परिमंडळ, ठाणे.
१८.जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, ठाणे
१९.जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे
२०.प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
२१.सह जिल्हा निबंधक वर्ग १ ठाणे (शहरी)
२२.सह जिल्हा निबंधक वर्ग १ ठाणे (ग्रामीण)
२३.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ठाणे
२४.जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, ठाणे
२५.जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, ठाणे
२६.उप विभागीय अधिकारी ठाणे/कल्याण/उल्हासनगर/भिवंडी
२७.जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, ठाणे (कोंकण भवन)
२८.प्रकल्प अधिकारी, एकत्मिक आदिवासी विकास प्रकल्प,शहापूर,जि.ठाणे
२९.प्रादेशिक बंदर अधिकारी, ठाणे (मोरा बंदर)
३०.वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षणआणि विकास यंत्रणा, ठाणे
३१. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण मंडळ, ठाणे/ कल्याण/ नवी मुंबई
३२. तहसिलदार ठाणे/कल्याण/ मुरबाड/उल्हासनगर/अंबरनाथ/भिवंडी/शहापूर अपर तहसिलदार मिरा-भाइंदर
३३.जिल्हा आरोग्य अधिकारी ठाणे
३४.जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे
३५.मुख्याधिकारी,अंबरनाथ/कुळगांव-बदलापूर/मुरबाड/शहापूर



Scanned with OKEN Scanner

**विषय** : - २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत

**संदर्भ** : -१. मा.सह सचिव, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग,यांचेकडील पत्र
क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.२१/मुसेहआ/कक्ष-२ दिनांक ०१/०४/२०२५
२. या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक ०२/०४/२०२५
३. मा.राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसुली विभाग यांचेकडील पत्र
क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र.३४ /रासेहआ/कक्ष-१/१३७
दिनांक ०७/०४/२०२५

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र क्र ३ सोबत जोडले असून त्यात नमूद केलेप्रमाणे, शासनाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/९४/२०२४-Lokshahidin दि. ०१ एप्रिल २०२५ निर्गमित करुन २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच मा.मुख्य आयुक्त राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र दि.०१.०४.२०२५ च्या अन्वये दि.२८ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रात "सेवा हक्क दिन" तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या दशकपूर्तीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

मा.राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसुली विभाग यांनी ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र अ व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र ब मध्ये दिला आहे.

वरिलप्रमाणे दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही उच्च प्राधान्याने करुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.आयुक्त कार्यालयास दि.१५ मे २०२५ पर्यंत सादर करावयाचा आहे. तत्पूर्वी प्रत्येक कार्यालयाने आपलेकडील कार्यक्रमाची रुपरेषा निश्चित करुन त्याचा अहवाल या कार्यालयास दि.२५/०४/२०२५ पूर्वी सादर करावा.

**(हरिश्चंद्र पाटील)**
**उप जिल्हाधिकारी (सा.प्र) ठाणे**

Scanned with OKEN Scanner

**राज्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, कोकण महसुली विभाग**
कक्ष क्र. 727/721, 7 वा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - 400 614
दूरध्वनी क्र 20870515 Email - crts.konkan@maharashtra.gov.in

क्र. संकिर्ण-2025/प्र.क्र.34/रासेहआ/कक्ष-7/930 दिनांक: ०७ एप्रिल, 2025

प्रति,

१. जिल्हाधिकारी, पालघर, ठाणे,रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, ठाणे,रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग
३. पोलीस आयुक्त,ठाणे,नवी मुंबई
४. पोलीस अधिक्षक, पालघर, ठाणे,रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग
५. महापालिका आयुक्त, ठाणे, नवी मुंबई

**विषय**:- 28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजर करणेबाबत.
**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/94/2024-Lokshahidin, दि.01 एप्रिल, 2025

शासनाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/94/2024-Lokshahidin, दि.01 एप्रिल, 2025 निर्गमित करून 28 एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच मा. मुख्य आयुक्त राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. बैठक-2025/प्र.क्र.21/मुसेह आ/कक्ष-2. दि.01.04.2025 च्या अन्वये दि.28 एप्रिल, 2025 रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत असल्याने, या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्रामपातळीवर विशेष उपक्रम राबविण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दि. 28 एप्रिल, 2025 रोजी आपण आपल्या जिल्ह्यामध्ये "सेवा हक्क दिवस तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 च्या दशकपूर्तीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. या अनुषंगाने ग्रामपातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये व जिल्हापातळीवर आयोजित करावयाच्या उदाहरणादाखल कार्यक्रमांचा तपशिल प्रपत्र-ब मध्ये दिला आहे.

वरिल सुचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही उच्च प्राधान्याने करुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास १५ मे,२०२५ पर्यंत पाठवावा.

बलदेव सिंह (भाप्रसे से. नि.)
राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसुली विभाग.

प्रत-
१. विभागीय आयुक्त कोकण महसूली विभाग

Scanned with OKEN Scanner

## प्रपत्र –अ

| अ.क्र. | ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|
| १ | दि.२८.०४.२०२५ रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामपंचायत बैठकीचे आयोजन करणे, त्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रती सर्व ग्रामपंचायत सदस्यांना देणे व उक्त कायद्याच्या ठळक तरतूदींचे वाचन करणे. |
| २ | प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विहित सूचना फलक या पूर्वी लावले नसल्यास तसे माहिती फलक लावणे. |
| ३ | प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये अधिसूचित सेवांची व दरांची माहिती देणारा तसेच तक्रार नोंदवीण्यासाठी QR CODE लावणे. |
| ४ | प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी QR CODE लावणे. |
| ५ | ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र.आरटीएस-३८२४/प्र.क्र.८९/मातंक, दि.२८ जानेवारी, २०२५ प्रमाणे ग्रामपंचायत स्तरावरील सर्व आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व ऑनलाईन सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्याची सुरूवात करणे. |
| ६ | ग्रामपंचायत स्तरावर बांधकाम पुर्ण झालेल्या उभारावयाच्या आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन/ बांधकाम प्रस्तावीत असणाऱ्या आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे कोनशिला समारंभ आयोजित करणे. |
| ७ | जिल्हयातील सर्व आपले सरकार केंद्र चालकांमध्ये लोकसेवा हक्क कायदयाचे महत्व व त्या बद्दलची संवेदनशीलता वाढवण्यासाठी केंद्र चालकांना प्रशि क्षण आयो जित करणे . |



Scanned with OKEN Scanner

## प्रपत्र —ब

| अ.क्र. | जिल्हा स्तरावर आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|
| १ | जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात सकाळी ११.०० वाजता सर्व पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी व सर्व संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांनी सेवेची बांधिलकी मानणारी शपथ घेणे.( शपथेचा मसुदा लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल.) |
| २ | "सेवा हक्क दिवसा" च्या अनुषंगाने मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व मा. खासदार, मा. आमदार, इतर लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, नागरिक यांचे उपस्थितीत समारंभाचे आयोजन करणे. सदर कार्यक्रमांतर्गत -<br>i. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०२५ ची वैशिष्ट्ये विषद करणे.<br>ii. विविध विभागांच्या सेवा देण्याच्या कामाचा आढावा सादर करणे.<br>iii. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करणे. |
| ३ | बांधकान पुर्ण झालेल्या आदर्श आपले सरकार केंद्राचे उद्घाटन/ बांधकाम प्रस्तावित असलेल्या आदर्श आपले सरकार केंद्राचे कोनशिला समारंभ आयोजित करणे. |
| ४ | जिल्ह्यात वर्धा जिल्याच्या धर्तीवर सेवादूत योजना सुरू करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे. |
| ५ | सर्व आपले सरकार केंद्र व सर्व शासकीय कार्यालयात सेवांची व दरांची माहिती देणारा तसेच तक्रार नोंदविण्यासाठी QR CODE लावणे. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आसेकें-१७२५/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७ मार्च २०२५ च्या सुधारित शासन निर्णयाप्रमाणे) |
| ६ | नागरिकांना SMS व्दारा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत व आपले सरकार पोर्टलबाबत अवगत करणे. (यासाठी सेतू मधील निधीचा वापर करता येईल.) |
| ७ | जिल्ह्यातील गर्दीचे ठिकाणी जसे की, आठवडी बाजार , पर्यटन स्थळे, तीर्थ स्थळे, इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ विषयी माहिती फलक (QR कोडसह) प्रदर्शित करणे. |
| ८ | विद्यार्थी/ महिला/ इतर घटक यांचेशी सदर कायद्याविषयी सुसंवाद साधून सदर कायद्याविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने मेळाव्यांचे आयोजन करणे. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ९ | शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, राज्य सेवा हक्क आयोग व आपले सरकार पोर्टल या संदर्भात निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धा परिसंवाद इ. चे आयोजन करणे. |
| १० | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५च्या प्रचारासाठी पथनाट्य, नाटके, गाणे, लोककलांचा वापर सुरू करणे. |
| ११ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५च्या प्रचारासाठी समाज माध्यमांचा वापर सुरू करणे. |
| १२ | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आसेकें-१७२५/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७ मार्च २०२५ अन्वये नवीन आपले सरकार सेवा केंद्रांचे उद्‌घाटन/ कार्यान्वयन करणे. |
| १३ | राज्य सेवा हक्क कायदयाच्या व्यापक प्रचार व प्र सिध्दी साठी भारत स्काउट व एन सी सी च्या विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन व्यापक स्वरुपात कार्यक्रमांचे आयोजन करणे. |

Scanned with OKEN Scanner